# कोरोनाचे आंतरराष्ट्रीय परीणाम : विशेष संदर्भ चीनवरील परीणाम

डॉ. विश्वनाथ महादेव आवड, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.
संपर्क क्रमांक : 9422028838 मेल : vishwa685@gmail.com

……………………………………………………………………………………………

प्रस्तावना : खुप वर्षापुर्वी अरूण साधू या लेखकाचे ड्रॅगन जागा झाल्यावर हे पुस्तक वाचलेले होते. नकळत तेव्हा पासूनच या देशाच्या सामाजीक राजकीय जीवनाबददल कुतुहल होते पुस्तकाचा सरतेशेवटी सार असा होता की एके दिवशी चीन फुटणार व त्याचे तुकडे होणार पण लेखकाने जर तर असे लिहले होते पण कदाचीत ती वेळ जवळ आलीय असे आज वाटायला लागलेले आहे. जागतीक पातळीवर निर्माण झालेला जटील व कुटील प्रश्न म्हणजे कोरोना. संपुर्ण जगाला थांबायला लावलेल्या या संसर्गजन्य रोगाने केवळ मानवी जीवनावरच परीणाम केलेला नाही तर मानवी जीवनाशी निगडीत असलेली सर्व क्षेत्रे प्रभावित केलेली आहेत.माणूस हा समाजशिल प्राणी आहे असे ॲरीस्टॉटल म्हणत असला तरी कोरोनामुळे त्याला त्याचे समाजशिल असलेले जीवन स्वपेक्षा जास्त मोठे करता येणार नाही हे दाखवून दिलेले आहे. जगातील एकादा दुसरा देशच या महामारी पासून वाचला असेल अन्यथा जवळपास सर्वच देशांवर याचे प्रचंड परीणाम झालेल्या पुढील काळात मिळतील. जागतीक राजकारणाची उलथापालथ करणारया या विषाणुने जगाच्या राजकारणावर मोठा प्रभाव पाडलेला आपणास पहावयास मिळू शकतो.

कोरोनाचे परीणाम : कोरोनाचे आंतरराष्ट्रीय परीणाम खालील प्रकारे सांगता येतात

1. सामाजीक क्षेत्र 2.आर्थिक क्षेत्र 3.राजकिय क्षेत्र 4.पर्यटन क्षेत्र 5.धार्मीक क्षेत्र या व अशा अनेक क्षेत्रात कोरोनाचा प्रभाव आपणाला पहावयास मिळतो आहे पुढील काळात मिळणार आहे.त्यामुळे प्रस्तृत संशोधन पेपरची मांडणी करताना फक्त कोरोनाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विशेषत: चीनमध्ये काय परीणाम होतील याच विषयाची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्राथमिक साधने व दुय्यम साधने** : या संशोधन पेपरसाठी वर्तमानपत्रातील विविध प्रकारचे लेख, इंटरनेटवरील माहिती, विविध विचारवंताच्या चॅनेलवरील मुलाखती व न्युज चॅनेलवरून मिळालेल्या माहितीचा अधार घेतलेला आहे.

**विषय मांडणी :** कोरोना विषयी या संशोधन पेपरची मांडणी करीत असताना महत्वाच्या गोष्टीमध्ये सुरवातीला चीनची या देशाची वैशिष्ठे स्पष्ट करावी लागतात. चीनच्या बाबतीत अनेक वैशिय्ठे सांगता येतील पण संशोधन पेपर मांडणीसाठी फक्त वरील तीन वैशिष्ठयांचाच विचार केला आहे.

1. बंदिस्त असलेली राजकीय व सामाजीक जीवन : अगदी सुरवातीपासुनच चीनच्या बाबतीत सांगीतले जाते की या देशाची व्यावस्था नेमकी कशी आहे याबाबत जास्तीची माहिती मिळत नाही. याचे कारण म्हणजे सामाजीक व राजकीयदृष्टा चीन प्रचंड बंदिस्त असलेला देश आहे. आजपर्यंत तरी तेथील जनतेने त्याला पाठिंबा दिला असे दिसते पण पुढील काळात हि बंदिस्थ व्यावस्थाच चीनला मारक ठरू शकते. लोकांना स्वविकासासाठी काही अधिकार काही स्वातंत्रपणा आवश्यक असतो पन चीनमध्ये अशा पध्दतीचा खुलेपणा जनतेला नाही.

2. पक्षीय हुकुमशाही : पक्षीय हुकुमशाही हे ही वैशिष्ठे याठिकाणी सांगावे लागते पाश्चात्य लोकशाहीच्या संकल्पना आम्हाला मान्य नाहीत यावर उभारलेल्या साम्यवादी व्यावस्थेचा डोलारा प्रचंड मोठया लोकसंख्येला ताभ्यात ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने करीत आलेला आहे. परीणामी निर्माण झालेल्या लोकशाही मागणीच्या तियानमेन चौकातल्या चळवळी अंत्यत निर्घुणपणे राक्षसी कृत्याने संपविण्यात आल्या त्याची जगाला जास्तीची खबरही नाही.साम्यवादी हा एकच पक्ष याठिकाणी सर्वकष बनून कार्यरत आहे.त्या पक्षाचा सरचीटणीस किंवा मोडक्या तोडक्या घटनेने तयार केलेला प्रमुख हा पक्षीय हुकूमशाहीच्या जोरावर जास्तीतजास्त सत्ताधीश होण्याचाच प्रयत्न करीत आहे.

3. साम्राज्यवादी महत्वाकांक्षा : चीनची साम्राज्यवादी महत्वाकांक्षा व जगाचे नेतृत्व करण्याची लालसा लपून राहिलेली नाही ज्या ज्यावेळी संधी मिळाली तेव्हा तेव्हा चीनच्या व्यवस्थेने महासत्ता बनण्याचा प्रयत्न केलेला आहे. युरोप, अशिया, आफ्रीका अमेरीका या खंडातील देशांना केलेली आर्थीक मदत किंवा त्या देशांच्या अर्थकारणात केलेली आर्थीक गुंतवणूक ही साम्राज्यावादी धोरणातूनच झालेली दिसते. एकीकडे रशीयाचा अस्त होताना राहिलेल्या अमेरिकन महासत्तेलाही धक्का देण्याचा प्रयत्न चीनने कायमच केलेली अनेक उदाहरणे आहेत उदा : इटली स्पेन पाकिस्तान जर्मनी अमेरीकेतील आर्थीक गुंतवणूक

निष्कर्ष : वरील वैशिष्ठयांच्या आधारे व कोरोनाच्या पार्श्वभुमीवर काही महत्वाचे निष्कर्ष काढता येतात ते खालीलप्रमाणे.

1.कोरोनानंतर चीन मीहासत्ता म्हणून जगात प्रथम राष्ट्र निर्माण होणार असे चित्र जरी आज दिसत असले तरी चीनच्या सामाजीक व राजकीय व्यवस्थेचा व बंदिस्तपणाचा सदयकालात थोडासा अढावा घेतला तर चीन हा देश राजकीयदृष्टया फुटू शकतो असे वाटते.याचे महत्वाचे कारण म्हणजे चीनमध्ये उदयाला आलेला मध्यमवर्ग ज्या वर्गाला स्वताचे अधिकार पाहिजेत जे जागतीकीकरणानंतर जगातल्या मध्यमवर्गाला असलेले चीनच्या मध्यमवर्गाने पाहिलेले आहेत.जे चीनमध्ये त्यांना मिळत नाहीत.

2. चीनच्या व्यवस्थेने कोरोनाच्या बाबतीत जो गहाळपणा दाखविला आहे तो अक्षम्य आहे. चीनमुळेच कोरोनाचे परीणाम जगाला भोगावे लागत आहेत.याबाबतीत रशियाच्या चेर्नोबेल या अणुभटट प्रकल्पातील गळतीचा संदर्भात आपणास सांगता येंईल. 1991 नंतर रशियन राजवट फुटायला सुरवात झाली त्याला पेरोस्त्रोइका व गास्तनोस्त या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे.पण तेव्हा सत्तेवर असलेले मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी दिलेले एका मुलाखतीत सांगीतले होते की रशीया फुटण्यास कारणीभूत ठरलेला महत्वाचा घटक म्हणजे चेर्नोबेल अणुभटटीत झालेली वायूगळती आणि हे प्रकरण ज्या पध्दतीने रशियन राजवटीने हाताळले किंवा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला त्याचाच परीणाम जनतेवर झाला व रशीया फुटीच्या मार्गावर गेला. नेमकी आत्ता तीच परिस्थिती वुहानच्या बाबतीत सांगावी लागेल. कोरोना प्रकरण उघडकिला आल्यानंतर ज्या पध्दतीने चीनी राजवटीने हाताळले ते हाताबाहेर गेल्यानंतर जगाला सांगायला सुरवात केली तोपर्यंत जगात हाहाकार उडायला सुरवात झालेली होती.

3.चीनची आर्थिक महासत्ता असणारी ओळख काही काळाने कमी व्हायला सुरवात होईल. जगातली दुसरया क्रमांकाची अर्थसत्ता आज चीनची असली तरी भविष्यात कोरोनाच्या पार्श्वभुमीवर तेथे असलेल्या मोठ मोठया उघोगातली गुंतवणूक जगातले अनेक देश कमी करण्यास सुरवात करतील यात शंका नाही कारण कोरोनामुळे चीनची विस्वासार्हता संपत चाललेली आहे.

4. पर्यटन व वाहतूक व्यवसायावर परीणाम : जागतीक लोकसंख्येचा विचार करता जरी चीन मोठा देश असला तरी अर्थव्यवस्था कमकुवत व्हायला सुरवात झाली की लोकांच्या हाताला काम मिळणे कठीण होईल त्याचे परीणाम पर्यटन व वाहतूक सारख्या क्षेत्रावर झाल्याशिवाय राहणार नाहीत.जरी प्रत्यक्षात चीनच्या महत्वाच्या व मोठया शहरांना कोरोनाचा फटका बसला नसला तरी हे जगाल न उलघडणारे कोडे आहे की चीनच्या वुहान प्रांतातच फक्त हाहाकार झाला बाकीच्या ठिकाणी का नाही या व अशा अनेक प्रश्नामुळे चीनची जागतीक विश्वासार्हता संपुष्टात आलेली आहे.

5.चीनची साम्राज्यवादी महात्वाकांक्षा कधीच संपलेली नाही याच कारणास्तव शेजारच्या अनेक देशाबरोबरचे संबध हे तणावपुर्णच आहेत. मोठया प्रमाणात आर्थिक रसद पुरवून एकादया देशात हस्तक्षेप करणे हे चीनला नवीन नाही त्यातुनच त्यांची जगाची महासत्ता होण्याची व आर्थिक क्षमतेच्या जोरावर जगातल्या इतर देशांना झुलवत ठेवणे हे ही लपून राहिलेले नाही.

6.कोरोनाच्या पार्श्वभुमीवर जगाच्या राजकीय सामाजीक क्षेत्रांची प्रचंड वाताहत व उलथापालथ झालेली असली जागतीक पर्यावरणाच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे ती म्हणजे स्वच्छ झालेले वातावरण.

7. भारतासारख्या देशाला भविष्यात काही उघोग व्यवसायाच्या माध्यमातून मोठया संधी चालून येतील हा ही महत्वाचा परीणाम सांगावा लागेल.

8.कोरोनामुळे मुलभूत संशोधन व़ अरोग्य क्षेत्रात जगातले सर्वच देश मोठी गुंतवणूक करतील.

संदर्भ

1. लोकसत्ता व महाराष्ट टाईम्सचे लेख
2. संपादक भाऊ तोरसेकर यांची मुलाखत
3.आंतरराष्टीय संबध विश्लेषक शैलेंद्र देवळानकर यांची मुलाखत
4. ड्रॅगन जागा झाल्यावर : अरूण साधु
5. विकिपीडीया चीन माहिती